# जतन करण्यासाठी आशीर्वाद

*~ गुरुमाई चिद्विलासानंद*

*‘मंदिरात राहा’ सत्संग*

*शनिवार, ४ जूलै, २०२०*

शुभ गुरुपौर्णिमा समर्पित आहे,
सन्मान करण्यासाठी
गुरू-शिष्याच्या नात्याचा,
ज्यामध्ये गुरू निर्देश देतात आणि शिष्य शिकतो,
गुरू मार्ग दाखवतात आणि शिष्य अनुसरण करतो,
गुरू शक्तिपात प्रदान करतात आणि शिष्याचे रूपांतरण होते,
गुरू बोलतात आणि शिष्य ऐकतो,
गुरू आज्ञा देतात परम सत्याशी एकाकार होण्याची
आणि शिष्य ही अलौकिक स्थिती प्राप्त करण्याचा हरएक प्रयत्न करतो.

शिष्यांना नेहमीच हे स्पष्ट नसते की,
ते शोध का घेतात,
श्रीगुरूंचा शोध घेण्याची अभिलाषा त्यांना का आहे,
एखाद्या आध्यात्मिक मार्गाचे अनुसरण ते का करतात,
एखाद्या महात्म्याशी अनपेक्षितपणे त्यांची भेट का आणि कशी होते,
पण एक गोष्ट स्पष्ट आहे :
त्यांचा शोध हे सिद्ध करतो की, त्यांच्या हृदयात खोलवर,
ते अशी महत्त्वाकांक्षा बाळगतात की,
त्यांनी भगवंताला जाणावे,
भगवंताला प्राप्त करावे,
त्यामध्ये विलीन व्हावे
जे सर्वाधिक दिव्य आहे आणि जे जीवनाच्या चैतन्यशक्तीचे दमन
करते त्या सगळ्याच्या पलीकडे आहे.

या ब्रह्मांडातील प्रत्येकावर आणि प्रत्येक गोष्टीवर
ग्रहांचा आणि ताऱ्यांचा
स्वतःचा असा गुरुत्वाकर्षणी प्रभाव असतो.
संस्कृत आणि हिंदी भाषांमध्ये
या प्रभावाला ‘गुरुत्वाकर्षण’ म्हणतात.

यात काही आश्चर्य आहे का, की या संयुक्त शब्दात,
हे दोन शब्द निहित आहेत—
‘गुरू’ आणि ‘आकर्षण’?
‘गुरू’चा अर्थ आहे ‘महान’ आणि ‘आकर्षण’ म्हणजे ‘ओढ’ किंवा ‘खेचले जाणे’.
गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाने खेचले गेल्यामुळे,
खगोलीय ग्रहतारे वर आकाशात अधांतरी स्थित राहतात!
त्याचप्रमाणे, आध्यात्मिक मार्गावर गुरू-शिष्याच्या नात्यामध्ये
एक चुंबकीय समतोल असतो.
हा असा समतोल असतो ज्याची घडण साधनेच्या शक्तीने होते.

साधना ही एका शिष्याच्या जीवनाची विश्वसनीय पार्श्वभूमी आहे
आणि सर्वाधिक खरी अग्रभूमी आहे.
साधना ही शिष्याची एकनिष्ठ सहचर आहे.
ती शिष्याला सुरक्षित ठेवते आणि तारते,
मग सूर्याच्या आणि चंद्राच्या तेजस्वी प्रकाशाचा वर्षाव होत असो
अथवा या आकाशीय पिंडांना ग्रहण लागलेले असो.
श्रीगुरूंचा प्रकाश सदासर्वदा झगमगत राहतो.

जेव्हापासून हा पृथ्वीग्रह अस्तित्वात आला आहे,
तेव्हापासून अगणित आपदांचा पेटारा
एका नव्हे, तर अनेक रूपांमध्ये उघडत राहतो आहे.
या विषयावर अनेक कथा लिहिल्या गेल्या आहेत,
अनेक महाकाव्यांची रचना केली गेली आहे.
याच कारणास्तव, श्रीगुरूंचा कोमल हात,
जो शिष्यांना या दलदलीतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवतो,

गुंतागुंतीच्या भवसागरामध्ये
तो सदोदित त्यांचा जीवनाधार बनून राहील.

आयुर्वेदामध्ये रोगांवर गुणकारी औषधे आहेत.
परंतु केवळ श्रीगुरूंची कृपाच शिष्यांना भवरोगापासून वाचवू शकते,
भवरोग हा असा विषय आहे, ज्याविषयी अन्वेषण आयुष्यभर केले जाते,
आणि ज्यावर श्रीगुरूंच्या करुणेनेच विजय प्राप्त केला जातो.

श्रीगुरूंची शिकवण शिष्यांना दिशा देते ज्यायोगे त्यांनी
चंद्राच्या विविध कलांच्या पलीकडे जावे,
चंद्राच्या परिवर्तनशील प्रवृत्तीच्याही पुढे जावे
आणि सर्व बाह्य तत्त्वांना तिलांजली देऊन
व श्वासोच्छ्वासाच्या शक्तीचा उपयोग करून आपल्या भरकटणाऱ्या मनाला,
जे महत्त्वपूर्ण आहे त्याच्या सारतत्त्वापर्यंत घेऊन जावे,
आणि आपले अवधान विषयाच्या मुळावर एकाग्र करावे.
सूर्य तेजस्वीपणे तळपत असो
किंवा वादळ प्रबळतेने घोंघावत असो,
श्रीगुरूंची शिकवण ही शिष्याच्या साधनेला आधार देते.

श्रीगुरूंचे प्रज्ञान शिष्यांकरिता हे स्पष्ट करते की,
मायाजगताला एक स्वप्न समजून ते त्याला विसरू शकत नाहीत,
केवळ इच्छा बाळगून ते आपल्या जीवनातील वेदना आणि व्यथा दूर करू शकत नाहीत,
केवळ विचार करून ते आपल्या मनातील अंधकार दूर सारू शकत नाहीत,
अथवा डावपेच आखून,
ते स्वतःची क्षुद्रता काढून टाकून त्या जागी आपल्या महानतेला स्थापित करू शकत नाहीत.
आपल्या प्रत्येक श्वासागणिक,
प्रत्येक पावलागणिक,
प्रत्येक क्षणी,
निरंतरपणे प्रयत्न करत राहणे
हे सर्वोपरी आहे.

शिष्यांकरिता असलेले श्रीगुरूंचे चिरस्थायी प्रेम
शिष्यांना मुक्त करते,
जे गमावले आहे त्याच्याशी निगडित असलेल्या असांत्वनीय भावनांपासून,
लौकिक सुखांची तृष्णा
आणि अलौकिक प्राप्तींची अभिलाषा
यांच्या कात्रीत सापडल्याने उडालेल्या गोंधळापासून,
इतरांच्या यशप्राप्तीला
मलिन करण्याच्या अदम्य इच्छेपासून,
आणि त्यांच्या स्वतःच्या साधुत्वाचा विनाश करण्यापासून.
श्रीगुरूंचे प्रेम जीवन जगण्याच्या त्यांच्या पद्धतीत सुधारणा करते
जेणेकरून विजय प्राप्त व्हावा—वाईटावर चांगुलपणाचा विजय.

गुरू-शिष्याच्या नात्याचे सामर्थ्य असे असते की,
शिष्यांच्या क्रियाशील मनाच्या नकळत,
शांती प्राप्त झालेल्या त्यांच्या हृदयाला,
एका पावन मंदिराचा शोध लागतो
ज्यामध्ये अनाहत नाद ऐकू येतो.
त्यांच्या हृदयाच्या आणि अस्तित्वाच्या गर्भगृहात या नादाचे तरंग उमटत राहतात,
आणि तो त्यांच्यातील त्रस्ततेला
व जन्मजन्मांतरींच्या त्यांच्या अस्वस्थतेला शांती बहाल करतो.

श्रीगुरूंचा जयजयकार जे कृपेचा वर्षाव करत असतात,
या जगात जेव्हा शांती नांदत असते
आणि जेव्हा ते उलटेसुलटे असते,
या जगातील रहिवासी जेव्हा अत्यानंदाने जीवन जगत असतात
आणि जेव्हा ते नैराश्याच्या गर्तेत बुडून गेलेले असतात.

आज, 'गुरू ॐ' या मंत्राचा जप करत असताना
तुम्हाला शुभ गुरुपौर्णिमेच्या अमृतमयी आनंदाची अनुभूती होवो.

तुम्हाला याची जाण होवो की, अभ्यासांविषयी तुमचे अविचल प्रेम
तुमच्या मनाचा, हृदयाचा आणि आत्म्याचा उद्धार करेल.

आनंद असो वा आपत्ती, दोन्हींमध्ये तुम्ही सदासर्वदा स्थिरचित्त राहावे.

आज आणि प्रत्येक दिवशी आपल्या जीवनाचा नव्याने आरंभ करण्यासाठी
तुम्ही प्रत्येक श्वासात ईश्वराचे प्रेम भरून घ्यावे.

साधनेत प्रगती करण्यासाठी तुम्ही दृढ निश्चयी राहावे,
तुमच्या शारीरिक, मानसिक, आणि आध्यात्मिक ऊर्जांना बळकट करावे,
अभ्यासांविषयी तुमची वचनबद्धता अढळ राहावी,
आणि तुमच्या महान आत्म्यासाठी तुम्ही
ज्या कोणत्याही ध्येयाची कल्पना केली आहे,
त्याचे उत्तुंग शिखर गाठण्याच्या तुमच्या इच्छेविषयी तुम्ही
ठाम राहावे.

सर्वकाही चांगले आहे.
तरीदेखील, या सर्वाला तुम्ही *महान* बनवू शकता,
तुम्ही निर्धारित केलेल्या प्रत्येक संकल्पाद्वारे,
तुम्ही उच्चारलेल्या प्रत्येक शब्दाद्वारे,
तुम्ही केलेल्या प्रत्येक कर्माद्वारे.

*ईश्वराचे स्तुतिगान करा,* असे आपण शिकलो आहोत.
*श्रीगुरूंचे महिमागान करा,* असे आपल्याला शिकवले गेले आहे.
*भगवंत महान आहे,* असे आपण ऐकले आहे.
*श्रीगुरू प्रकाश आहेत,* हे आपण जाणू लागलो आहोत.
पण या साऱ्याला काय अर्थ आहे, जर लोक अज्ञानामुळे अशा गोष्टी करतच राहतात,
ज्यांमुळे माणुसकीप्रति आणि या पृथ्वी ग्रहावर जे काही आहे त्याप्रति
अनादर आणि तिरस्कार यांना मुभा मिळावी?

म्हणून, मी तुमच्यासमक्ष हा विचार मांडू इच्छिते :
तुमच्या विचारांना आणि कर्मांना अशा उंचीवर न्या
की ज्यामुळे तुम्हाला स्वतःबद्दल अतीव अभिमान वाटेल.
जेव्हा गुरुकृपेचा तुमच्यावर वर्षाव होतो,
तेव्हा तुमचे अस्तित्व झगमगत्या दिव्य प्रकाशाने उजळून निघते.
तुमच्या निष्कलंक अस्तित्वातून केवळ प्रकाशच प्रसरित होतो.

ध्यानं सत्यं पूजा सत्यं सत्यं देवो निरञ्जनः।
गुरोर्वाक्यं सदा सत्यं सत्यं देव उमापतिः॥

ध्यान सत्य आहे,
पूजा सत्य आहे,
निरंजन परमेश्वर सत्य आहे.
श्रीगुरूंचे शब्द सदैव सत्य आहेत
आणि उमापती, शिव सत्य आहेत.

गुरुपौर्णिमेच्या या शुभ प्रसंगी
शिष्यांनी केलेली श्रीगुरुपूजा
शिष्यांच्या जीवनात
कल्याणकारी दृश्य, विचार, शब्द आणि कर्म घेऊन येवो.
गुरुप्रसन्नता सदैव राहो—
श्रीगुरू प्रसन्न राहोत.

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्।
मन्त्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोः कृपा॥

ध्यानाचे मूळ आहे, श्रीगुरूंचे रूप.
पूजेचे मूळ आहे, श्रीगुरूंचे चरण.
मंत्राचे मूळ आहे, श्रीगुरूंचा शब्द.
मोक्षाचे मूळ आहे, श्रीगुरूंची कृपा.

तस्मै श्री गुरवे नमः।
मी श्रीगुरूंना नमस्कार करतो.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.